MHOS130016862024

**कौ.हि.म.सं.अर्ज क्र.१६/२०२४**

संध्या पालवे वि. श्रीकांत पालवे

**आदेश नि.क्र.०९ वर**

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदाराचे कथन असे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक २८.११.२०२० रोजी देवाची आळंदी येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व रितीरिवाजाप्रमाणे झाला असुन त्यांचे नाते अद्याप अस्तित्वात आहे. गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदाराची सासु आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्नाचा खर्च अर्जदाराचे आईवडीलांनी केला असुन लग्नाचा खर्च जवळपास ५,००,०००/- रुपये केला आहे. अर्जदार लग्नानंतर तिचे सासरी गैरअर्जदार यांचे घरी नांदण्यासाठी गेली असता गैरअर्जदार यांनी तिला एक ते दोन वर्ष चांगले सांभाळले. परंतु, त्यानंतर त्यांनी अर्जदार हिला करणी-धरणीच्या कारणावरुन, तसेच आईवडीलांकडुन ५,००,०००/- रुपये घेऊन ये म्हणुन सतत मानसिक व भावनिक त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार क्र.१ हा दारु पिऊन येऊन त्याची मावशी व गैरअर्जदार क्र.२ यांचे सांगणेवरुन अर्जदारास मुलबाळ होत नाही, तु वांझोटी आहेस म्हणुन शारिरीक व मानसिक त्रास देऊन मारहाण करणे, उपाशी ठेवणे, घराबाहेर घालविणे असा त्रास देत असत. अर्जदार सर्व त्रास सहन करुन नांदतच होती. गैरअर्जदार याने अर्जदार हिस दोन महिने व्यवस्थित नांदविले व त्यानंतर तिच्या आईवडीलांकडे आणुन सोडले. अर्जदार ही परत दिनांक ०३.०१.२०२४ रोजी गैरअर्जदार यांचेकडे आली. त्यावेळी गैरअर्जदार यांनी अर्जदारास

तु परत का आली, तुझ्या आईवडीलांनी लग्न व्यवस्थित केले नाही, आमचा मानपान केला नाही तसेच फ्लॅट घेण्यासाठी आईवडीलांकडुन ५,००,०००/– रुपये घेऊन ये असे म्हणुन त्रास देत असत. अर्जदाराचे आईवडीलांनी ३,००,०००/– रुपये गैरअर्जदार यांना दिले. त्यानंतरही गैरअर्जदार यांनी अर्जदारास फ्लॅट घेण्यासाठी २,००,०००/– रुपये घेऊन ये म्हणुन तिला घराबाहेर हकलुन दिले. अर्जदाराच्या आईवडीलांनी व नातेवाईकांनी गैरअर्जदार यांना अर्जदारास नांदविण्याची विनंती केली असता गैरअर्जदार यांनी आईवडील व नातेवाईकांना शिवीगाळ करुन हाकलुन दिले. अर्जदाराने दिनांक २४.१२.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ याचे विरोधात कौटुंबिक छळाबाबत शिरगाव परंदवडी पोलिस स्टेशन पिंपरी चिंचवड येथे भा.दं.वि.कलम ५०४ व ५०६ अन्वये, ३२३ करीता एन.सी.क्र.०४४७/२०२३, ००२१/२०२४, ००८०/२०२४ नोंद केली. परंतु, पोलिसांनी गैरअर्जदाराविरुध्द अद्याप कार्यवाही दाखल केली नाही.

**०३.** गैरअर्जदार यांनी अर्जदारास दिनांक ०२.०३.२०२४ रोजी रात्री ०९.०० वा. तिच्या केसाला धरुन मारहाण करुन, पायाला धरुन ओढत घराबाहेर काढले. गैरअर्जदार अर्जदारास फ्लॅट घेण्यासाठी आईवडीलांकडुन ५,००,०००/– रुपये घेऊन आली तरच सासरी ये नाहीतर नको येऊ, आलीस तर तुला जिवे मारुन टाकु असे म्हणुन तिच्या अंगावरील ५ तोळे सोन्याचे दागिने काढुन घेऊन तिला घराबाहेर हाकलुन दिले. तेव्हापासुन अर्जदार तिच्या माहेरी आईवडीलांकडे राहत आहे. अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार यांचे एकत्र कुटुंब असुन त्यांचे विकास नगर किवळे येथे आर.सी.सी. घर, ५ गुंठे रिकामी जागा असुन ६ रुम भाड्याने दिलेल्या आहेत त्यापासुन गैरअर्जदारांना ७० ते ८० हजार रुपये महिन्याला मिळतात. गैरअर्जदार क्र.१ हा मार्केटिंग व प्लॉटिंगचा व्यवसाय करत असुन त्यास दरमहा ४ ते ५ लाख रुपये

महिना उत्पन्न मिळते. सबब, अर्जदाराने तिच्या उदरनिर्वाहाकरीता गैरअर्जदार यांचेकडुन दरमहा ७ हजार रुपये अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

**०४.** गैरअर्जदार यांनी निशानी ११ कडे लेखी म्हणणे सादर करुन तेच म्हणणे सदर अर्जावरील म्हणणे समजण्याची पुरसीस नि.क्र.१३ वर दाखल केली आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केले आहेत. परंतु, त्यांनी अर्जदार हिच्या आईवडीलांनी लग्नाचा एकुण ५ लाख रुपये खर्च केला असल्याची बाब नाकारली आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदाराची सर्व कथने नाकारली आहेत. गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र.१ याचा अर्जदार हिचेसोबत दुसरा विवाह हा पहिल्या पत्नीपासुन रितसर घटस्फोट घेऊनच केला आहे. गैरअर्जदार व अर्जदार यांनी त्यांच्या लग्नाचा खर्च अर्धा–अर्धा मिळुन केला आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न एकमेकांच्या संमतीने व पसंतीने झाले आहे. गैरअर्जदार क्र.१ हा रॅपिडो पिंपरी चिंचवड येथे तात्पुत्या स्वरुपाची नोकरी करत असुन त्याला दरमहा २० हजार रुपये इतका पगार आहे व त्याच्यावर गैरअर्जदार क्र.२ ची जबाबदारी आहे. गैरअर्जदार क्र.२ ही वयस्कर असुन तिला शुगर व बी.पी. चा त्रास असल्यामुळे दरमहा ३ हजार रुपये इतका खर्च येतो. अर्जदार हिचा कपडे धुण्याचा लिक्वीड व फरशी व टॉयलेट धुण्याच्या पावडरचा व्यवसाय असुन सदर व्यवसायातुन ती दरमहा २५ ते ३० हजार रुपये नफा मिळविते. त्यामुळे अर्जदार तिचा खर्च भागविण्यास सक्षम आहे. लग्नानंतर अर्जदाराने काही दिवस व्यवस्थित संसार केला परंतु त्यानंतर गैरअर्जदार क्र .१ यास अनेक प्रकारे शारिरीक व मानसिक त्रास देत होती. अर्जदार हिला लग्ना अगोदर पासुन पोटदुखीचा त्रास असुन ती नेहमी पोटदुखीच्या गोळ्या खात होती, तिला नेहमी चक्कर येत होती, पोटदुखीमुळे अर्जदार ही कधीही उत्साही राहत नव्हती तसेच लग्न झालेपासुन अर्जदार हिला कधीही मासिक पाळी आली नव्हती त्यामुळे गैरअर्जदार याने त्याबाबत विचारण केली असता अर्जदार उत्तर

देण्यास टाळाटाळ करत होती. गैरअर्जदाराने अर्जदारास पोटदुखीच्या उपचाराकरीता डॉ. कुलकर्णी यांच्याकडे घेऊन गेले असता, डॉक्टरांनी अर्जदारास सोनोग्राफी करण्यास सांगितले परंतु अर्जदाराने सोनोग्राफी करुन घेतलेली नाही. अर्जदार व तिच्या आईवडीलांनी अर्जदाराच्या मासिक पाळीबद्दल माहिती असुन देखील त्यांनी जाणीवपुर्वक व हेतुपरस्पर सदरची बाब गैरअर्जदार यांचेपासुन लपवुन ठेवुन त्यांची फसवणुक केली आहे. अर्जदार हिने कोणतेही कारण नसताना गैरअर्जदार क्र.२ हिचेसोबत मोठे भांडण केले व आईपासुन वेगळे राहण्यास दबाव टाकत होती. अर्जदार घरातील कोणतेही काम करत नव्हती तसेच सासुला घरकामात मदत करीत नव्हती. अर्जदार हिची गैरअर्जदार क्र.१ याच्यासोबत संसार करण्याची इच्छा राहिलेली नाही त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याचीही तिच्याशी संसार करण्याची इच्छा राहिलेली नाही म्हणुन त्याने अर्जदार हिच्यापासुन घटस्फोट मिळण्यासाठी वडगाव मावळ येथील न्यायालयात विवाह अर्ज दाखल केला असुन तो प्रलंबित आहे. तसेच अर्जदार हिला गैरअर्जदाराकडे नांदायचे नाही म्हणुन गैरअर्जदार यांना त्रास देण्याच्या उद्देशाने व त्यांच्याकडुन पैसे उकळण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षाच्या विधिज्ञांनी युक्तीवादादरम्यान अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. अर्जदार हिने नि.क्र.१५ खाली ७/१२ उतारे व घरमिळकतीचे उतारे दाखल करुन त्यावर भिस्त ठेवली आहे.

**०६.** अर्ज व त्यावरील म्हणणे विचारात घेतले असता, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्यातील नातेसंबंध विवादित नाहीत. अर्जदार ही तिच्या आईवडीलांकडे गैरअर्जदार यांनी हाकलुन दिल्यामुळे नाईलाजास्तव राहत असल्याचे कथन करते. याउलट गैरअर्जदार यांनी अर्जदारास नांदविण्यासाठी प्रयत्न केले असलेबाबतचा

कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ याने त्याचे अर्जदार हिचे बरोबर संसार करण्याची इच्छा राहिली नसल्यामुळे त्याने घटस्फोटाकरीता न्यायालयात अर्ज दाखल केल्याचे कथन केले आहे. यावरुन गैरअर्जदार यांनी अर्जदारास पैसे मागणीच्या कारणावरुन शारिरीक व मानसिक त्रास दिला आहे ही बाब सकृतदर्शनी दिसुन येते.

**०७.** तसेच अर्जदार तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन ती तिच्या आईवडीलांवर अवलंबुन असल्याचे कथन करते. याउलट गैरअर्जदारांच्या कथनानुसार, अर्जदार ही कपडे धुण्याचे लिक्वीड, फरशी व टॉयलेट धुण्याचे पावडरचा व्यवसाय करत असुन त्यापासुन तिला दरमहा २५ ते ३० हजार रुपये नफा मिळतो. परंतु, त्याबाबत गैरअर्जदारांनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. याउलट अर्जदाराने गैरअर्जदार यांचे शेतीविषयक ७/१२ उताऱ्याच्या प्रती याकामी अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. ७/१२ उताऱ्यावर गैरअर्जदार क्र.१ याचे नावे इतर कुटुंबियांसोबत सामाईक शेती असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र.१ याने त्याचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रामध्ये मासिक वेतन २० हजार रुपये असल्याचे नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र.१ याने त्याच्या मालमत्ता व दायित्वाच्या शपथपत्रामध्ये त्याला जमीनीमध्ये त्याचा हिस्सा नसल्याचे नमुद केले आहे परंतु अर्जदाराने दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यावर गैरअर्जदार क्र.१ याच्या नावाची नोंद सामाईक क्षेत्रास आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याच्या नावे शेतजमिन असल्याचे दिसुन येते. तसेच गैरअर्जदार क्र.२ हिचे नावे विकास नगर किवळे पुणे येथे घर (नि.क्र.१५/६) असल्याचे दिसुन येते.

**०८.** वरील सर्व बाबी लक्षात घेता गैरअर्जदाराचे एकत्र कुटुंबाच्या शेतीतील अंदाजीत उत्पन्न, गैरअर्जदार पतीस मिळणारा पगार रक्कम रु.२०,०००/-, गैरअर्जदार क्र.१ याचेवर त्याच्या आईची जबाबदारी, अर्जदार व तिचा उदरनिर्वाहाकरीता लागणारा

खर्च, वैद्यकीय खर्च, राहनीमान व इतर जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती, तसेच गैरअर्जदाराच्या कुटुंबातील व्यक्तींचा खर्च इत्यादी गोष्टी विचारात घेता, गैरअर्जदार पती हा अर्जदारस रक्कम रु.३,०००/– इतकी अंतरिम पोटगी मंजुर करणे योग्य होईल. करीता मी खाली आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिस रुपये ३,०००/– (अक्षरी रूपये तीन हजार फक्त) दरमहा सदर आदेशाच्या दिनांकापासून अंतरिम पोटगी द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत ही दोन्ही पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

AMRAPALI BABURAO JONDHALE
Digitally signed by AMRAPALI BABURAO JONDHALE
Date: 2026.07.29 17:38:53 +0530

दिनांक : २९.०७.२०२४

(**श्रीमती ए. बी. जोंधळे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.१, भूम.

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. S. Hingmire, (Grade-III) |
| Court | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Bhoom |
| Date | :- | 29.07.2026 |
| Order signed by the Presiding officer on | :- | 29.07.2026 |
| Order uploaded on | :- | 29.07.2026 |